**एतदर्थ मंडळ ( मराठी प्रशिक्षण व परीक्षा ), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे ( पूर्व ), मुंबई ४०००५१

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक - विहित पाठयपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

रविवार, दिनांक ९ जानेवारी, २०२२

वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.४५

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून )**

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

गुण

प्रश्न क्र १. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

साखरेत सर्वात अधिक कॅलरीज असतात, म्हणून बिनसाखरेचा चहा सुरू केला. पहिल्या दिवशी विशेष फरकही वाटला नाही. घरात साखरबंदी जाहीर केली. कुटुंबाला सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची सक्त ताकीद दिली. "मुलांसाठी म्हणून काय थोडं गोडाधोडाचं करायचं ते कर," एवढी सवलत ठेवली. पहिल्या दिवशीच मला फरक जाणवायला लागला. भात अजिबात वर्ज्य करणे अवघड होते, म्हणून फक्त पहिला भात आणि ताकभात ठेवून मधला भात वर्ज्य केला नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार किती पोकळ होता, याचा अनुभव ती खाल्ल्यावर आला आणि नेहमीच्या भाजीत 'ही' निराळे काय करते याचा अजूनही अंदाज आला नाही.

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्याने तर माझ्या 'डाएट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ तयार केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार' च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्त्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते- म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती'त ला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली? या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(अ) पंतांना खाल्लेले गोड का लागत नव्हते?

(ब) पंतांच्या साखरबंदीचे वर्णन करा.

(क) नाडगौडाला वाईट वाटू नये म्हणून पंतांनी काय केले?

(ड) पंतांच्या कचेरीपर्यंत कोणती वार्ता गेली?

(इ) नाडगौडाने स्पेशल भज्यांची ऑर्डर का दिली?

[ उलटून पहा. ]

गुण

प्रश्न क्र २. खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा. २०

(अ) 'शाल व शालीनता' यांचा "शाल" या पाठाच्या आधारे कळलेला अर्थ लिहा.

(ब) 'जाता अस्ताला' या स्थूलवाचनाच्या आधारे सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणा-या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.

(क) 'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली' हे विधान 'जंगल डायरी' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(ड) 'निरंजन खरा नागरिक' हे विधान तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

(इ) युनियन हायस्कूलमधील शिक्षकांबद्दल डॉ. माशेलकर यांनी कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत?

(फ) 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' या विधानाची यथार्थता लिहा.

प्रश्न क्र ३. (अ) खालीलपैकी कोणत्याही दहा प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. १०

(अ) योग्यांचे गोडपण कोणाला संतुष्ट करते?

(ब) सुनीताबाईंनी शालीबद्दल विचारताच लेखक रा. ग. जाधव लगेच हो असे का म्हणाले ?

(क) अब्दुलला कोणती कला साधली होती?

(ड) स्क्रीनवर उमटलेला पायपुसणीच्या आकाराचा निळा चौकोन कोणासारखा होता?

(इ) कोणामुळे लेखक माशेलकर यांना खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला?

(फ) वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल दक्ष का होती?

(ग) लेखक चंदू बोर्डे यांचा जन्म कुठे झाला?

(ह) निरंजनचा कोणता पेपर बुडाला ?

(य) कशावर आपला अधिकार आहे असे कवी म्हणतो ?

(र) डोळे भरून पहावे असे दृश्य कोणते?

(ल) झाड कोणासारखे बसते?

(व) कवी पाठक उत्क्रांतीचा ललकार कोठे घुमवायला सांगतात?

(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा. (कोणतेही २) ५

(१) पक्ष्यांच्या मंजूळ नादात झाडाचंही जीवनाचं<br>
एक संथ गाणे दडलेले असते

(२) या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार<br>
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ||

(३) उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे<br>
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...

प्रश्न क्र ४. खालीलपैकी कोणत्याही दहा रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. १०

(अ) उदक सुखी करी एक वेळ | _______ सर्वकाळ सुखदाता ||

(ब) भुकेल्यास अन्न द्यावे, तहानलेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या _______ तरी द्याव्यात !

(क) ----------ही शक्ती आहे.

(ड) आपल्याला येत नसताना दुस-यांना _______सांगणं योग्य नाही.

(इ) स्वत:साठी सारेच जगतात; पण दुस-यासाठी जगण्यातला _______?

(फ) या _______ झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील.

(ग) 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण _______ या जगात मान नाही.'

[ उलटून पहा. ]

(ह) तुमच्यासारख्या ________ मित्रांमुळे माझं मनोरंजनही होईल, ज्ञानही वाढेल आणि... त्यामुळे माझे लेखनही सुधारेल.

(य) _______ संरक्षणासाठीही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही.

(र) रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेवू ______

(ल) आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या _______ टवटवीत

प्रश्न क्र ५. (अ) खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. १०

| | | |
|---|---|---|
| (१) विपर्यास करणे | (२) तजवीज करणे | (३) उत्साह ओसंडणे |
| (४) पल्ला गाठणे | (५) आनंदाचा कल्लोळ होणे | (६) संभ्रमित होणे |

(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचे अर्थ लिहा. ५

| | | |
|---|---|---|
| (१) संयम | (२) जिव्हा | (३) सल्ला |
| (४) निराहार | (५) कष्ट | (६) गोजिरा |

प्रश्न क्र ६. (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा. ५

(१) आकाशात अष्टमीचा ------ हसत होता.

(२) --------- निरीक्षणांची चांगली संधी हातची गेली म्हणून मी हळहळलो.

(३) दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात --------स्तुती फोटोसकट छापून आली होती.

(४) माझ्या बाबतीत तर------- ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती.

(५) कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता --------न बोलावता दरवर्षी येतात.

(६) --------पावडेकाकांची आणखी काही माहिती घेतली आणि ॲपवर भरली.

(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा. ५

(१) मी २००४ साली मराठी <u>साहित्य</u> संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो.

(२) आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत <u>मिठाई</u> घालून आणली होती.

(३) रघुभैय्याने दुकानाला रंग देण्याचे <u>काम</u> काढले होते.

(४) संघर्षासाठी <u>आत्मविश्वास</u> मिळवून दिला.

(५) <u>निरंजनने</u> तो दगड उचलून बाजूला ठेवला.

(६) आजोबांच्या खोलीत मराठी व्युत्पत्ती <u>कोश</u> आहे.

(क) पुढीलपैकी कोणत्याही पाच नामांची वचने बदला. ५

| | | |
|---|---|---|
| (१) बगळा | (२) पुस्तक | (३) दिवा |
| (४) नदी | (५) रस्ता | (६) विहीर |

(ड) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांपासून नामे बनवा. ५

| | | |
|---|---|---|
| (१) माध्यमिक | (२) सार्वनामिक | (३) आर्थिक |
| (४) सामाजिक | (५) सांस्कृतिक | (६) औद्योगिक |

[ उलटून पहा. ]

(इ) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांच्या संधी सोडवा. ५

| | | |
|---|---|---|
| (१) महिलाश्रम | (२) निद्रिस्त | (३) गुरूपदेश |
| (४) राजर्षी | (५) सदैव | (६) अत्युत्तम |

(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही पाच वाक्ये पुन्हा लिहा. ५

(१) आता परयंत किती झाडं तूम्ही लावली आहेत?
(वाक्य शुद्ध करून लिहा.)

(२) यावर तो शालीन कवी मनापासून हसला.
(अधोरेखित शब्दांची जात ओळखून लिहा.)

(३) कोण बोलवतंय मला ?
(वाक्याचा प्रकार ओळखा.)

(४) त्याने मला डाएटचा सल्ला दिला.
(कर्त्याचे लिंग बदल करा.)

(५) "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस."
( उभयान्वयी अव्यय ओळखा.)

(६) पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो.
(वाक्यातील काळ ओळखा.)

---------------*-------------------*-----------

## एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**
**प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक ९ जानेवारी, २०२२
वेळ :- दुपारी २.१५ ते सायंकाळी ४.४५
**(एकूण गुण १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

**प्रश्न क्र.१ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळीत तुमचे विचार मांडा. २०**

(अ) विज्ञान आणि मानव
(ब) माझा भारत महान

**प्रश्न क्र.२ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा. २०**

(अ) आजची स्त्री मुक्त आहे काय? याविषयी चर्चा करा.
(ब) व्यवसाय शिक्षणाचं महत्त्व याविषयी चर्चा करा.

**प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा. ३०**

(अ) सौ. मिताली पाटील यांनी ऑनलाईन शिक्षण असलेल्या कालावधीमधील रजा मंजूर करण्यासंबंधी मा. शिक्षणाधिकारी, जि. प. सोलापूर यांच्याकडे अर्ज केला आहे याविषयी टिप्पणी व पत्राचे प्रारूप तयार करा.
(ब) तुमच्या विभागातील एकही कोविशिल्ड लसीकरण न झालेल्या लोकांना लस उपलब्ध करून देण्यासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांना विनंतीपत्र लिहा.
(क) तुमच्या परिसरामध्ये सातत्याने होणाऱ्या खंडित वीज पुरवठा यांविषयी तुमच्या विभागातील नगरपालिकेच्या विद्युत विभागाला विनंतीपत्र लिहा.
(ड) 'माझे विद्यार्थी माझी जबाबदारी' या कार्यक्रमाअंतर्गत मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या आयोजनाबाबत परिपत्रक तयार करा.

**प्रश्न क्र.४ पुढील कोणत्याही पाच इंग्रजी शब्दप्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या. ०५**

(अ) State emblem (ब) Duty burden
(क) Interim order (ड) Programme schedule
(इ) Living wages (फ) Abbreviated address

**प्रश्न क्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा.** १०

(अ) I thought doing this would be easy, but we have been working all day and we are still not finished.

(ब) It will take some time, but I think I will be able to learn how to play the guitar.

(क) Five hundred soldiers were sent to the city, and less than half of them survived.

(ड) I met an old man who says that he is never eaten at a restaurant in his whole life.

(इ) The passengers who were injured in the accident were taken to the nearest hospital.

(फ) Sooner or later, we will have to buy a new TV since the TV we have now is a very old model.

**प्रश्न क्र.६ खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** १५

The etiquettes adapted by an ideal person or a gentleman are good manners. Maintaining a good relationship with others, respecting elders, welcoming our guests and behaving properly are all good manners. Good manners make a person modest and polite. One who knows how to behave in the society is respected everywhere. Man is a social animal. It is expected that he should not cause any nuisance to the society. People hate a person who does not follow the rules and regulations of the society. Good manners should be inculcated in children at an early age. Parents are the first teachers of a child. They should tell their children how to behave. Teachers and schools are the next to teach manners to children.

Good manners improve the attitude of a person infusing high thinking and converts hatred into love. Speaking properly to others, politenesses, respecting elders, helping others are nothing but good manners. Offering help to senior citizens, handicapped or blind people in buses or trains, helping sick or injured people in buses or trains, helping sick or injured people, consoling them are also good manners. Good behaviour is a valuable ornament that everybody should wear. It brings a positive change in a person.

-*-*-*-*-*-*-*-*-